**प्रेसनोट** **दिनांक ०३/०८/२०१९**

# गुन्हे शाखा पुणे शहर

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील अवैध धंदे, रात्री उशीरा चालणा-या हॉटेल/आस्थापना, प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ वगैरे यावर कारवाई करणेचे आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने श्री. अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर व मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेने दि. ०२/०८/२०१९ ते ०३/०८/२०१९ रोजीचे रात्रौ खालील नमूद प्रमाणे कारवाई केलेली आहे.

युनिट-१ पथकाने गुन्हे शाखा युनिट-४ चे हद्दीतील ०८ वाहनचोर गुन्हेगार चेक केले असता ०६ गुन्हेगार मिळून आले. त्यांचे फोटो व वैयक्तिक माहिती घेण्यात आली आहे. तसेच शिवाजीनगर व चंदननगर पो.स्टे. हद्दीतील एफ.सी. सोशल, मुळीक कॅपिटल, चायना टॉस, व्हाईट टेरेस अशा ०४ हॉटेल / आस्थापना चेक केल्या. त्याचप्रमाणे शिवाजीनगर व डेक्कन पो.स्टे. चे हद्दीत ०८ पानटप-या / व्यावसायिकांवर कोटपा ॲक्ट प्रमाणे खटले दाखल केले.

युनिट-२ पथकाने गुन्हे शाखा युनिट-३ चे हद्दीतील १६ वाहनचोर गुन्हेगार चेक केले असता ०५ गुन्हेगार मिळून आले. मिळून न आलेल्या गुन्हेगारांपैकी ०३ जेलमध्ये व ०३ तडीपार आहेत. तसेच बंडगार्डन व कोरेगाव पार्क पो.स्टे. हद्दीतील सिनको, तत्थ्य, मिलेर्स, बोटॅनिका, बाओबॅब, २ बीएचके, प्रेम्स अशा ०७ हॉटेल / आस्थापना चेक केल्या. त्याचप्रमाणे लष्कर पो.स्टे. चे हद्दीत ०३ पानटप-या / व्यावसायिकांवर कोटपा ॲक्ट प्रमाणे खटले दाखल केले.

युनिट-३ पथकाने गुन्हे शाखा युनिट – ५ चे हद्दीतील २५ वाहनचोर गुन्हेगार चेक केले असता ११ गुन्हेगार मिळून आले. मिळून न आलेल्या गुन्हेगारांपैकी ०२ तडीपार आहेत. तसेच मुंढवा पो.स्टे. हद्दीतील कार्निवल, लोकल गोस्टे बिअर, ठिकाणा, ग्रो क्लब, फ्लंज बार किचन हॉटेल, मेट्रो लॉन्स, थाबर कॅफे, ओर्नेक्स अशा ०९ हॉटेल / आस्थापना चेक केल्या. त्यापैकी ०२ हॉटेल / आस्थापना शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू असताना मिळून आल्याने त्यांचेवर म.पो.का.क. ३३(क्ष) प्रमाणे खटले दाखल केले आहेत.

युनिट-४ पथकाने खडकी पो.स्टे. चे हद्दीतील ०५ वाहनचोर गुन्हेगार चेक केले असता ०४ गुन्हेगार मिळून आले. तसेच बंडगार्डन पो.स्टे. हद्दीतील सिंको रेस्टॉरंट, २ बीएचके डायनर ॲन्ड कि क्लब, बोटानिका रेस्टॉरन्ट, तत्थ्य रेस्टॉरन्ट अशा ०४ हॉटेल / आस्थापना शर्तीपेक्षा जास्त वेळ घ्वनी क्षेपकाचा वापर करताना मिळून आल्याने त्यांचेवर म.पो.का.क. ३३(क्ष) प्रमाणे खटले दाखल केले आहेत.

युनिट-५ पथकाने युनिट-२ हद्दीतील ३१ वाहनचोर गुन्हेगार चेक केले असता ०७ गुन्हेगार मिळून आले. मिळून न आलेल्या गुन्हेगारांपैकी १२ जेलमध्ये आहेत. तसेच कोरेगावपार्क व बंडगार्डन पो.स्टे. हद्दीतील मग शॉट, हिडन स्पेस, स्पेस बार, फ्लाय, ओ, मलाका स्पाईस, जॉन जॅमसन ॲन्ड सन्स, द सॅसी स्पून, इपिंगुट, ब्रेवरीज, द डेली ऑल डे अशा १० हॉटेल / आस्थापना चेक केल्या. त्यापैकी ०१ हॉटेल / आस्थापना शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू असताना मिळून आल्याने म.पो.का.क. ३३(क्ष) सह १३५ प्रमाणे खटला दाखल करण्यात आला आहे.

खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक (पूर्व) पथकाने कोंढवा व हडपसर पो.स्टे. चे हद्दीतील गॅब्रीला पब, अंगराज हॉटेल, कार्निव्हल हॉटेल, एजंट जॅक, मेट्रो लॉज, बीटॉस, सिल्व्हर स्पून, नाईट रायडर अशा ०८ हॉटेल / आस्थापना चेक केल्या. त्यापैकी ०२ हॉटेल / आस्थापना शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू असताना मिळून आल्याने त्यांचे विरुध्द म.पो.का.क. ३३(क्ष) सह १३५ प्रमाणे खटला दाखल करण्यात आला आहे.

खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक (पूर्व) पथकाने कोंढवा व हडपसर पो.स्टे. चे हद्दीतील गॅब्रीला पब, अंगराज हॉटेल, कार्निव्हल हॉटेल, एजंट जॅक, मेट्रो लॉज, बीटॉस, सिल्व्हर स्पून, नाईट रायडर, सुफी व जश्न अशा १० हॉटेल / आस्थापना चेक केल्या. त्यापैकी सुफी व जश्न असे ०२ हॉटेल / आस्थापना शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू असताना मिळून आल्याने त्यांचे विरुध्द म.पो.का.क. ३३(क्ष) सह १३५ प्रमाणे खटला दाखल करण्यात आला आहे.

खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक (पश्चिम) पथकाने बंडगार्डन, चतुःश्रृंगी, शिवाजीनगर, खडक पो.स्टे. चे हद्दीतील ०९ तडीपार, घरफोडी चोरी व जबरी चोरी करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक केले. तसेच खडक व स्वारगेट पो.स्टे. चे हद्दीतील विनापरवाना चालू असलेल्या खादय पदार्थ विक्री करणा-या ०८ टपरी धारकांवर म.पो.का.क. ३३(क्ष) सह १३१ प्रमाणे खटले दाखल करण्यात आले आहेत.

सामाजिक सुरक्षा विभागाने फरासखाना पो.स्टे. चे हद्दीतील बुधवार पेठ येथील ताजमहल बिल्डींग, नवीन बिल्डींग, सपना बिल्डींग, डायमंड बिल्डींग येथे १४ मुलींकडून वेश्याव्यवसाय करुन घेणा-या ०४ अज्ञात मालक व ०१ मॅनेजर यांचे विरुध्द फरासखाना पो.स्टे. येथे गु.र.नं. २६३/१९, पिटा ॲक्ट कलम ३,४,५,७ प्रमाणे दाखल करुन काजल गोरे तमांग हिस अटक केली व १४ मुलींची सुटका केली.

**दि. ०२/०८/२०१९ ते ०३/०८/२०१९ रोजी रात्रौ गुन्हे शाखेने केलेली कामगिरी**

| **युनिट / पथक** | **किती वाहनचोर आरोपी चेक केले** | **किती मिळून आले** | **किती हॉटेल / आस्थापना चेक केल्या** | **किती खटले भरले** | **इतर कार्यवाही** |
|---|---|---|---|---|---|
| **युनिट-१** | ०८ | ०६ | ०४ | -- | कोटपा ॲक्ट – ०८ खटले. |
| **युनिट-२** | १६ | ०५ | ०७ | -- | कोटपा ॲक्ट – ०३ खटले. |
| **युनिट-३** | २५ | ११ | ०९ | ०२ | -- |
| **युनिट-४** | ०५ | ०४ | ०४ | ०४ | -- |
| **युनिट-५** | ३१ | ०७ | १० | ०१ | -- |
| **खंडणी (पूर्व)** | -- | -- | ०८ | ०२ | -- |
| **खंडणी (पश्चिम)** | -- | -- | ०८ | ०८ | ०९ तडीपार, घरफोडी, जबरी चोरी गुन्हेगार चेक केले. |
| **सामाजिक सुरक्षा विभाग** | -- | -- | -- | -- | फरासखाना-२६३/१९, पिटा ॲक्ट कलम ३,४,५,७ – ०१ आरोपी / १४ मुलींची सुटका. |
| **एकूण** | **८५** | **३३** | **५०** | **१७** | **कोटपा खटले – ११ इतर गुन्हेगार चेक-०९ पिटा कारवाई - ०१** |